**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ०४/१२/२०२२

**दि.०३/१२/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०५८/२०२२, भा.दं.वि. संहिता कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९; आर्म अॅक्टकलम ३, ४, २५, २७; महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७(१), १३५ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३, ७. प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०२/१२/२०२२ रोजीचे १८.३० वा. सुमारास परशुराम चौक, चिंचवड, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी ०५/११ वा. |
| फिर्यादी | :- | अर्जुन नागु गायकवाड, वय- ३२ वर्षे, जात- (हिंदु) महार, धंदा- वॉशिंग सेंटर व्यवसाय, रा. शिवपार्पती हौ. सोसायटीच्या शेजारी, अष्टविनायकचौक, मोरे वस्ती, चिखली, पुणे |
| आरोपी | :- | १)दाद्या उर्फ विशाल मरीबा कांबळे<br>२)राजु मरीबा कांबळे वय ३२ वर्षे<br>३) सिध्द्या मरिबा कांबळे वय २८ वर्षे<br>४) कच्चा उर्फ मिलींद मरिबा कांबळे, वय ३५ वर्षे सर्व रा.महात्मा फुले नगर मोहननगर चिंचवड<br>५)विशाल लष्करे, रानगर, चिंचवड<br>६) करण उर्फ ससा (पुर्णनाव माहित नाही)<br>७) सीजे उर्फ चैतन्य जावीर (पुर्णनाव माहित नाही)<br>८) ओमकार शिंदे (पुर्ण नाव माहित नाही)<br>९) यश सुभाष कुसाळकर वय १९ वर्षे रा.हनुमान प्रो.स्टोअर्स मागे रामनगर चिंचवड<br>१०)करण गायकवाड (पुर्ण नाव माहित नाही)<br>११)रोहित मांजरेकर (पुर्ण नाव माहित नाही)<br>१२) सुरज मोहिते (पुर्ण नाव माहित नाही)<br>१३) निलेश लष्करे (पुर्ण नाव माहित नाही)<br>१४) बालाजी कोकाटे (पुर्ण नाव माहित नाही)<br>१५)मोहन भिमराव विचटकर, वय १९ वर्षे रा.सहजीवन कंपनीजवळ रामनगर चिंचवड (पुर्ण नाव माहित नाही) व इतर २ ते ३ अनोळखी इसमांनी<br>**आरोपी क्र २,३,४,९,१५ अटक व**<br>**विधीसंघर्षित बालक क्र १० ताब्यात आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मयत इसम नामे विशाल नागु गायकवाड वय ३८ वर्षे यांचे सख्खे भाउ असुन यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन जुन्या भांडणाचा राग मनात धरून व व्यावसायिक स्पर्धेतुन कोयत्याने मारहान करून जिवे ठार मारले व घटनास्थळ परिसरात बंदुकीच्या गोळया हवेत झाडुन दहशत पसरवुन ६ ते ७ मोटार सायकलवरून पळुन गेले आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि गुन्हे भोजराज मिसाळ ९५९४७७६३६३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ८२७/२०२२ भा.द.वी. कलम ३६३. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०२/१२/२०२२ रोजी १८.०० वाजण्याचे सुमारास भक्ती शक्ती चौक ,समोरील पुलाखाली निगडी पुणे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी १३/३१ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय – ५६ |
| आरोपी | :- | अज्ञात इसम. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १२ वर्षे हिस कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी कारणासाठी फुस लावुन फिर्यादी यांचे कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि राजेंद्र भोसले ७९७७००३२५७ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | आळंदी ३५४ /२०२२ भा.दं.वि. कलम-३७०(३),३४ सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०२/१२/२०२२ रोजी २१/२० वा.चे सुमा. मौजे आळंदी मरकळ रोड,घुंडरे पेट्रोल शेजारी असलेल्या हॉटेल साईकृपा लॉजिंग मधील रुम नं- ३ मध्ये आळंदी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/११/२०२२ रोजी ०५/०५ वा |
| फिर्यादी | :- | मारुती महादेव करचुंडे वय ३६ वर्षे पोना १५३६ नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड ७७७६००४७००७ |
| आरोपी | :- | १)सागर रघुनाथ पाटील/काटे वय २४ वर्षे रा. अनिल तापकीर यांच्या भाडयाचे रुममध्ये, संतोषी माता मंदिर,नाकोडा मंदिराच्या बाजुला,आळंदी पुणे<br>**२)पाहिजे आरोपी-**अफताब शेख पुर्ण नाव माहित नाही वय ४० वर्षे रा.मोशी पुणे<br>**३)पाहिजे आरोपी-** संतोष वासुदेव घुंडरे वय ३८ वर्षे रा.आळंदी पुणे<br>**आ.क्र.१ अटक आहे.** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी संगणमताने त्यांचे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलांना पैशांचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि पाटील ९८५०५७६७८९ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ९८१/२०२२ भादंवि कलम ३२८,२७२, २७३,१८८ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०२/१२/२०२२ रोजी २०/३० वा. राजा पान शॉप टपरी, बापुजी बुवा चौक, भोसरी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी ०२.०६ वा |
| फिर्यादी | :- | संदिप वसंत जोशी वय ४० वर्ष, पो.शि २४४५ नेम भोसरी पोलीस स्टेशन पि.चि पिंपरीचिंचवड |
| आरोपी | :- | इब्रान ताहिर अन्सारी वय २२ वर्ष रा. आण्णा लांडगे यांची रुम,चक्रपाणी, भोसरी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत याने शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शारिरिक हानी होऊ शकते हे माहित असतांना देखील २,९५५/- रु. किं. चा तंबाखुजन्य गुटखा याची साठवणुक करून विक्री करत असतांना मिळुन आला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि केंद्रे ९६८९००३५१७ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड १०२६/२०२२ भादवि कलम १८८, ३२८, २६९, २७०, २७२, २७३, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०३/१२/२०२२ रोजी १२.३५ वा. चे सुमारास थेरगाव येथील डांगे चौक उड्डान पुलाचे खाली पी.डी.सी.सी.बँकेचे समोर रस्त्याचे कडेला, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे शेजारी असलेली हातगाडीवर व डांगे चौक उड्डान पुलाचे खाली एम.एस.इ.बी. डीपी चे बाजुला एका पांढरे रंगाचे टाटा येस गाडीमधील टपरीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी २२.२५ वा |
| फिर्यादी | :- | सदानंद विजय रुद्राक्षे, पोलीस शिपाई २०९८, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं.चिं. |
| आरोपी | :- | १)इरफान ताहीर तांबोळी, वय ३२ वर्षे, धंदा हातगाडी चालक, रा घर क्र ०५, पंचवटी कॉलनी, गजानन नगर, काळेवाडी फाटा, पुणे मुळ गाव मौजे सावरगाव, ता भुम जि उस्मानाबाद<br>२)सादिक गफुर तांबोळी, वय २७ वर्षे, धंदा टपरी चालक, रा गल्ली क्र ०६ सुदर्शन कॉलनी, वाकडरोड, वाकड पुणे मुळ रा मौजे उमापुर, ता गेवराई जि बिड<br>३)हुसेफा खान नामाचा फेरीवाला संपुर्ण नाव व पत्ता माहिति नाही<br>४)प्रदिप गुप्ता नावाचा फेरीवाला संपुर्ण नाव व पत्ता माहिति नाही<br>**आ.क्र.१ व २ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमूद तारीचा वेळी व ठिकाणी आ.क्र.१ यांने त्याचे ताब्यातमध्ये एक मोबाईल व ०२ पांढरे पोत्यांमध्ये एकुण ५४,९८१/- रुपये किंमतीचा वेगवेगळया कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला विक्रीकरीता साठवणुक करीत असताना मिळुन आला. त्याने त्याचे ताब्यात मिळुन आलेला माल हा आकुर्डी येथील **आ.क्र.३** हा आणुन देत असल्याचे सांगितले. तसचे डांगे चौक उड्डान पुलाचे खाली एम.एस.इ.बी. डीपी चे बाजुला एका पांढरे रंगाचे टाटा येस गाडीमधील टपरीमध्ये आ.क्र.२ याचे ताब्यातील पांढरे रंगाचे पोत्यामध्ये एकुण २९३३.५०/- रुपये किंमतीचा वेगवेगळया कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला विक्रीकरीता साठवणुक करीत असताना मिळुन आला. असा एकणु ५७,९१४/- रु.किं.चा माल त्याचे ताब्यात मिळुन आलेला माल हा वाकड येथील **आ.क्र.**४ हा आणुन देत असल्याचे सांगितल्याने अ.क्र. १ ते ४ यांचे विरुध्द गुन्हा दाखल |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि अभय दाभाडे ९२८४२१६५३९ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहूरोड ७३१/२०२२ भादवि कलम ३८३, ३८४, ३८५, ३८६, ३८७, ३५४(अ), १२०(ब), ५००,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०६/१०/२०२२ रोजी ११.०० वा. ते आजपावेतो सुमारास आदर्शकॉलनी समर्थ टॉवरजवळ आदर्शनगर देहुरोड ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी १७.५९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)श्रीजीत रमेशन, देहुरोड ता.हवेली जि पुणे<br>२)मंगेश पोडाला,<br>३)आनिस शेख देहुरोड ता.हवेली जि पुणे<br>४)राजेश सपरे<br>५) समीर शेख<br>६)ॲडम देहुरोड ता.हवेली जि पुणे व त्याचे सोबत आलेला अनोळखी इसम व त्याचे टिम मधिल इतर इसम<br>**आ.क्र.२ अटक आहे.** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी श्रीजीत रमेशन व त्याचे साथीदार मंगेश पोडाला व एक अनोळखी इसम असे फिर्यादीचे साई सुपर मार्केट दुकानामध्ये येवुन श्रीजीत रमेशन यांनी दुकानात फिर्यादी उपस्थित नसतानाचे फोटो काढुन महिना २०००/- रु. हफ्ता चालु करुन देण्यास सांगुन पोलीसांकडे तक्रार देण्यासाठी गेल्यास फिर्यादीचे पतीस जिवे मारण्याची धमकी देवुन त्यातील १०००/- रु घेवुन गेले तसेच आमचे फोटो व्हायरल करतो असे |

सांगुन फिर्यादी यांनी त्यांना २०००/-रु. हफ्ता दिला नाही म्हणुन आमचे दुकानात काढलेले फोटो श्रीजीत रमेशन याने बेकायदेशीर ब्रेकिंग न्युजद्वारे व्हायरल करुन फिर्यादीची समाजात असलेली प्रतिष्ठा मलीन केली, पुन्हा दुकानात येवुन २०००/- रु ची मागणी करुन मोठे आधिका-यांकडे तक्रार करुन तुरुंगात टाकण्याची धमकी दिली तसेच"तुमकुच बुरी नही हो" असे म्हणुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न केली म्हणुन.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनिं थिटे ९९७०६६९८०९

०७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५१०/२०२२ भा.द.वी कलम ३५४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०२/१२/२०२२ रोजी १४.०० वा. चे सुमारास गट नं. १३३, गणेषनगर प्लॉट नं. १२, टाटा हौसिंग सोसायटीजवळ, सोमाटणे ता. मावळ, जि. पुणे घराचे समोरील रोडवर

गुन्हा दाखल :- ०३/१२/२०२२ रोजी १८.४१ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- श्रीकांत गणपतराव डेरे
**अटक नाही**

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत याने रस्त्याचे जाणे-येण्याचे कारणावरून फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा संदीप यास मादरचोदांनो मी तुम्हाला सर्वांना पाहुन घेतो. कोणालाही सोडणार नाही. असे शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी देवुन फिर्यादीचे छातीला व पोटाला पकडुन ढकलुन देवुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे अशा पद्धतीने शरीरास स्पर्ष करून विनयभंग केला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मदेवाड ८९९९०९५४७२

०८.

पोस्टे व गु.रजि.नं. :- वाकड १०२५/२०२२ भादवी कलम ३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०२/१२/२०२२ रोजी २०/०० वा ते २१/०० सुमा. सोना बियर बारचे समोर डांगे चौक वाकड

गुन्हा दाखल :- ०३/१२/२०२२ रोजी १८.५१ वा

फिर्यादी :- विठ्ठल मारूती वाडकर वय ५० वर्षे धंदा रिक्षा ड्रायव्हर रा शेडगे हाईट्स फ्लॅंट नं २०१ ए वाकड पुणे

आरोपी :- अज्ञात आरोपी

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे ताब्यातील १,२५,०००/- रु.किं.ची रिक्षा नंबर एम एच १४ एच एम १४९४ हि ह लॉंक व पार्क करून ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीचे इराद्याने स्वताचे फायद्यासाठी चोरून नेली आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जे.एस. गिरनार ९८१०९७१९

०९.

पोस्टे व गु.रजि.नं. :- सांगवी ५५४/२०२२, भा.दं.वि.कलम ४०६,४२० सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ३०/११/२०२२ रोजी साधारणतः १४/३० वाजताचे दरम्यान आश्रयदीप निवास, सुमीत फुडबाजारच्या बाजुला, लेन नंबर ०१, समर्थनगर, नवी सांगवी, पुणे २७ |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी १४/४९ वा |
| फिर्यादी | :- | प्रवीण श्रीरंग शिंदे, वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी, पत्ता आश्रयदीप निवास, सुमीत फुडबाजारच्या बाजुला, लेन नंबर ०१, समर्थनगर, नवी सांगवी, पुणे २७ |
| आरोपी | :- | इझी लाईफ १८ कंपनीत पुर्ण नाव पत्ता माहित नाही |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी ऑनलाईन ट्रेडींगमध्ये प्रथम रक्कम रुपये ०७,०००/- रु गुंतवली त्यावेळी फिर्यादी यांना त्याचा परतावा म्हणुन रक्कम रुपये ०९,१००/ रु फिर्यादी यांचे आय.सी.आय.सी.आय.बँक खात्यावर परत मिळाली. म्हणुन फिर्यादी यांनी पुन्हा रक्कम ३३,०००/-रु गुंतवली. त्यावेळी देखील फिर्यादी यांना पुन्हा त्याचा परतावा म्हणुन रक्कम रुपये ४२,९००/-रु असे मिळाले. त्यांनतर तिस-यांदा रक्कम ०१,३०,०००/- रु अशी गुंतवली. त्यादरम्यान फिर्यादी यांना टेलीग्रामवरुन मेसेज आला की, तुमचा परतावा तुम्हाला अधिक मिळण्यासाठी तुम्ही आणखीन जास्तीत जास्त रक्कम गुंतवा. म्हणजे तुमचा अर्थिक फायदा जास्त होईल. वरुन फिर्यादी यांनी त्यांच्या सांगण्यावरुन पुन्हा सदर कंपनीमध्ये ऑनलाईन रक्कम रुपये ०२,४०,०००/-रु असे गुंतवले.त्यानंतर तुमची कालची परताव्याची संपुर्ण रक्कम ही ०५,३०,०००/- रुपये झाली आहे. ती रक्कम ही आम्हाला तुमच्या खात्यावर पाठविण्याकरीता आणखीन तुम्ही ०२,५५,०००/- रुपये भरणे अपेक्षीत आहे व तुम्हाला पुन्हा रक्कम रुपये ०३,००,०००/-रु भरावे लागतील. मग मात्र त्यावेळी माझ्या लक्षात आले की, आपली काहीतरी फसवणुक होतेय. वरुन फिर्यादी यांनी त्यांनी शेवटी सांगीतलेली रक्कम भरली नाही. आणि त्या दिवशी १८/०० वाजेपर्यंत फिर्यादी यांनी रक्कम मला परत द्या म्हणुन त्यांना टेलीग्राम मेसेजद्वारे विनंती करीत राहीले. परंतु त्यांनी काही फिर्यादीचे विनंतीला मान दिला नाही. व ते फिर्यादी यांना टाळाटाळ करु लागले. वरुन फिर्यादी यांचे ०८,७५,०००/- रु ऑनलाईन पध्दतीने व्याजाचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि सुनिल तांबे गुन्हे ९८२३०७९८५२ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५०९/२०२२ भा.द.वी कलम ४०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०२/०८/२०२२ रोजी १८.०० वा. ते ०३/१२/२०२२ रोजी १७.०० वा. पर्यत महाराष्ट्र व्हेज नाँनव्हेज नावाचे रेस्टाँरंट सोमाटणे टोलनाका जवळ शंकरवाडी येथुन |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी १७/१४ वा |
| फिर्यादी | :- | शकुर मुबारक शेख वय ३४ वर्षे रा.६/१८ अंबिका गार्डन, तुकाराम नगर तळेगावं दाभाडे ता मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | साहिल शेख वय २३ वर्ष रा. मलकापुर,ता.कराड,जि.सातारा<br>**अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी विश्वासाने नमुद आरोपी यांला दिलेली फिर्यादी यांची मोटार सायकल(रॉयल एनफिल्ड)सिल्हर कलर ची मो.सा. नं.एम.एच१४इ.एल.३७८६ किंमत अंदाजे १ लाख रुपये ही स्वतःचे गावी मलकापुर,ता.कराड,जि.सातारा या ठिकाणी फिर्यादी यांचा विश्वासघात करुन स्वतःची आहे म्हणुन घेवुन गेला असुन तीचा स्वतः वापर करीत आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ कदम ९८२३२४८६०८ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५१२/२०२२ भा.द.वी कलम ३५४,३५४(ड) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०३/१२/२०२२ रोजी १३/०० वा सुमारास फिर्यादी राहते घरी तळेगावं दाभाडे पोलीस स्टेशन येथुन नाना नानी पार्क येथील रोडवरुन जात असताना ता मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी २२.२७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | वैभव विटे तळेगांव दाभाडे ता मावळ जि पुणे<br>**अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठीकाणी फिर्यादी हे तळेगावं दाभाडे पोलीस स्टेशन येथुन नाना नानी पार्क येथील रोडवरुन जात असताना आरोपीत हा फिर्यादीचे पाठीमागे आला व त्याने मोठयाने फिर्यादीला आवाज देउन म्हणाला की, " थांब तुला लय माज आलाय काय माझे विरुध्द पोलीसांकडे तक्रार करती का?"असे म्हणुन त्याने फिर्यादीचा पाठलाग केला तो रस्त्यात आडवुन फिर्यादीशी गैरवर्तन करतो की, या भितीने पळत सुटले त्याने फिर्यादीचे पाठीमागे लागुन फिर्यादीला आडवुन म्हणाला की, "आता तुला सोडणार नाही तु आता चल माझ्याबरोबर लॉजवर" असे बोलुन त्याने हाताला धरुन ओढु लागला त्याने फिर्यादी बरोबर असे वर्तन केल्याने फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न करुन फिर्यादीचा विनयभंग केला आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंपणे. ९८५०२५५२५९ |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ११७६/२०२२ भा.द.वि. कलम- ३८०,४५७, ४६१,४२७,३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०३/१२/२०२२ रोजी ०३/०२ ते ०३/१५ या कलावधी दरम्यान श्लोक एजन्सी, सर्व्हे नं ३५१, सिदधार्थनगर, स्मशान भुमीसमोर, शारदा निवास, बावधन येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/१२/२०२२ रोजी १८.२७ वा |
| फिर्यादी | :- | संतोष नवनाथ सुरवसे, वय ३२, धंदा - स्टेशनरी सप्लायर्स, रा - फलॅट नं १०१, श्लोक निवास, नंदनवन सिटी, सर्वे नं १८, न-हे, पुणे, |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी फिर्यादी यांच्या गोडाऊनचे लॉक कशाचे तरी साहयाने तोडुन गोडाऊन मधील सामानाचे खोडसाळपणे नुकसान करुन गोडाऊन मधील गल्लॅतील रोख रक्कम २,३०,०००/- रुपये फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि अजित काकडे, ९९७५७७२४६४ |

१३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण (महाळुंगे) १८४१/२०२२ कलम ३८० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २३/११/२०२२ रोजी १८.०० वा तेदि ०२/१२/२०२२ रोजी १५.०० वा मुदतीत. महीन्द्रा ॲन्ड महीन्द्रा कंपनी मौजे निघोजे ता.खेड जि.पुणे . |
| गुन्हा दाखल | :- | ०४/१२/२०२२ रोजी ०१.१४ वा. |
| फिर्यादी | :- | महेंद्र ज्ञानदेव घोरपडे,वय-४२ वर्षे, धंदा-नोकरी, राहणार-डांगे चौक थेरगाव ता.हवेली जि.पुणे |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी महिद्रा कंपनीतील एक्सयुव व्ही ७०० च्या मटेरीयल स्टोअर रुम मधुन एक्साईड कंपनीच्या व अमरा राजाकंपनीच्या ४९ बॅट-या एकुण १,४७,०२८/- रु कि. नवीन बॅट-या कोंणीतरी अज्ञात चोरटयाने स्वतः आर्थिक फायदया साठी लबाडीच्या ईरादयाने चोरुन नेल्या आहेत म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना सोनवणे महाळुंगे ८८०५७८७८०० |